I.O 47

N.C.R.B (एन.सी.आर.बी.)
I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT
**(Under Section 154 Cr.P.C.)**
प्रथम खबर अहवाल
(कलम १५४ फौजदारी प्रक्रिया संहिता)

1. **District (जिल्हा):** लातूर  **P.S.(ठाणे):** निलंगा
   **FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0234  **Year (वर्ष):** 2023
   **Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):**26/07/2023 01:17

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**
   1. **Day(दिवस):** मंगलवार  **Date From (दिनांक पासून):** 25/07/2023
      **Time Period (कालावधी):** पहर 5  **Date To (दिनांक पर्यंत):** 25/07/2023
      **Time From (वेळेपासून):** 14:31 बजे
      **Time To (वेळेपर्यंत):** 14:31 बजे

   (b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**
      **Date (दिनांक ):** 26/07/2023  **Time (वेळ):** 01:08 बजे

   (c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**
      **Entry No. (नोंद क्र.):** 002
      **Date & Time (दिनांक आणि वेळ):** 26/07/2023 01:08 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी
5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**
   1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**
   दक्षिण, 1 किमी  **Beat No. (बिट क्र.):**
   (b) **Address (पत्ता):** दत्तनगर, निलंगा येथील ,दुय्यम निबंधक कार्यालयात

   (c) **In case, outside the limit of this Police Station, then**
   (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):
   **Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**
   **District(State) (जिल्हा(राज्य)):**



Scanned with CamScanner

6. **Complainant / Informant** (तक्रारदार/माहिती देणारा):

(a) **Name** (नाव): लक्ष्मण भानुदास शिंदे

(b) **Father's/Husband's Name**(वडील / पती चे नाव) :

(c) **Date/Year of Birth** (जन्म तारीख/वर्ष): 1994

(d) **Nationality** (राष्ट्रीयत्व): भारत

(e) **UID No.** (यु.आय.डी. क्र.):

(f) **Passport No.**(पारपत्र क्र.):

**Date of Issue** (दिल्याची तारीख):

**Place of Issue** (दिल्याचे ठिकाण):

(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN)** ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address** (पत्ता):

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पत्ता | लांबोटा ता निलंगा,लांबोटा ता निलंगा,निलंगा,निलंगा,लातूर,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पत्ता | लांबोटा ता निलंगा,लांबोटा ता निलंगा,निलंगा,निलंगा,लातूर,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation** (व्यवसाय):

(j) **Phone number** (फोन नं.):

**Mobile** (मोबाइल नं.): 91-9767592784

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars** (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पत्ता) |
|---|---|---|---|---|
| 1 | अश्विनी दत्तात्रय जाधव | | | 1. आदर्श कलनी, लातूर,लातूर, लातूर शहर ,लातूर,महाराष्ट्र, भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant** (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):

9. **Particulars of properties of interest** (संबंधीत मालमत्तेचा तपशील):

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|
| 1 | नाणे आणि चलन | भारतीय- रुपया | 500 रुपये दराच्या 9 भारतीय चलनी नोटा 4500 | 4,500.00 |



Scanned with CamScanner

10 **Total value of property (In Rs/-)**
**(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):**

4,500.00

11 **Inquest Report / U.D. case No., if any**
**(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| **S.No.** (अ.क्र.) | **UIDB Number** (यु.आय.डी.बी.क्र.) |
| --- | --- |

12 **First Information contents** (प्रथम खबर हकीकत ):

दिनांक 25/07/2023
फिर्याद

मी लक्ष्मण भानुदास षिंदे वय 29 वर्षे, व्यवसाय षेती, रा. लांबोटा ता. निलंगा जि. लातूर मो.नं. 9767592784.
समक्ष फिर्याद देतो की, मी वरील ठिकाणचा राहणारा असुन मी दिनांक 24/07/2023 रोजी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, लातूर चे पोलीस उपअधीक्षक रेजितवाड साहेब यांना त्यांचे कार्यालयात जावून भेट घेवून एका लोकसेवका विरुध्द लाच मागणीची माझी तक्रार असल्याचे तोंडी तक्रार सांगितली. त्यांनी मला उदया दिनांक 25/07/2023 रोजी उदगीर मोड, निलंगा येथे सापळा कार्यवाही करण्याचे अनुशंगाने येण्यास सांगीतले. त्याप्रमाणे मी आज दिनांक 25/07/2023 रोजी सकाळी 09.30 वा. सुमारास वरील प्रमाणे सं◌ागितलेल्या ठिकाणी हजर आलो पोलीस उपअधीक्षक रेजितवाड साहेब हे त्यांचे खाजगी वाहनाने सदर ठिकाणी त्यांच्या सोबत असलेल्या कर्मचा-यासह हजर येवून त्यांनी मला सापळा पथकातील सदस्य व पंचांची ओळख्:करून देवुन माझे नांव गांव विचारले असता मी त्यांना माझे नं◌ाव वरीलप्रमाणे सांगुन माझी तोंडी तक्रार सांगुन सविस्तर लेखी तक्रार दिली, ती खालील प्रमाणे.
"मी मौजे लांबोटा गावाचा रहिवाषी असून षेती करुन पोट भरतो माझी मौजे लांबोटा षिवारात गट नं. 166 मध्ये षेत जमीन असून सदर जमीनीचे हिस्से पडल्याने मला त्या हिस्से पडलेल्या जमीनीचे सर्च रिपोर्ट, सुची क्र. 2, मुल्यांकन व दस्ताच्या नकलांची आवष्यकता असल्याने मी दुय्यम निबंधक कार्यालयाच्या संबंधीत काम करणा-या जाधव मॅडम यांना भेटलो असता त्यांनी मला विहीत नमुन्यात माहिती पुरविण्यासाठी 4 ते 5 हजार रुपये द्यावे लागतील असे म्हणून लाचेची मागणी केलेली आहे. त्यांनी मागणी केलेली रक्कम 4 ते 5 हजार रुपये ही कुठल्याही प्रकारची षासकीय फीस नसून त्यांना पैसे मागण्याचा व स्वीकारण्याचा अधिकार नाही. जाधव मॅडम यांनी केलेल्या मागणीप्रमाणे त्यांना लाचेची रक्कम देण्याची माझी इच्छा नसुन मी त्यांना कुठलीही थकबाकी देणे नाही. मी आज रोजी जाधव मॅडम यांची भेट घेवुन माझे वरील नमूद कामासंदर्भाने विचारणा करणार असुन पुन्हा त्यांनी स्वतः अगर इतरामार्फत लाचेची मागणी केल्यास संबंधीतांवर भ्र.प्र.का. अन्वये कार्यवाही करण्यात यावी. तसेच माझेषी त्यांचा कुठल्याही प्रकारचा आर्थीक तथा देवाण घेवाणीचा व्यवहार झालेला नाही, बाकी नाही." अषा आषयाची लेखी तक्रार दिली. मी दिलेली तक्रार पोलीस उपअधीक्षक रेजितवाड साहेब व पंचांनी वाचुन पाहुन त्यावर स्वाक्ष-या केल्या आहेत.
पोलीस उपअधीक्षक रेजितवाड साहेब यांनी मी दिलेल्या तक्रारीच्या अनुशंगाने दुय्यम निबंधक कार्यालयाच्या जाधव मॅडम यांनी मला माझ्या वर नमुद केलेल्या कामासाठी लाचेची मागणी केली आहे अगर कसे? याची पडताळणी करुन ती ध्वनीमुद्रीत करण्याचे ठरवुन त्यांचेकडील डिजीटल व्हाईस रेकॉर्डर बाबत मला व पंचांना माहिती सांगुन, ते कोरे असल्याचे खात्री करुन देवुन डिजीटल व्हॉईस रेकॉर्डरमध्ये सिलबंद पाकीटातील नविन कोरे मेमरीकार्ड टाकुन माझे व दोन्ही पंच तसेच पोलीस उपअधीक्षक रेजितवाड साहेब यांचे वक्तव्य ध्वनिमुद्रीत करुन पडताळणी करण्याचे ठरवुन सापळा कार्यवाहीबाबत मला व पंचांना तसेच सापळा पथकातील सदस्य यांना योग्य त्या सुचना दिल्या. त्यानंतर आम्ही सर्वजण सदर ठिकाणाहुन खाजगी वाहनाने निलंगा, दत्तनगर येथील दुय्यम निबंधक कार्यालयाचे जवळ आडबाजूस थांबून राहीलो.
त्यानंतर पोलीस उपअधीक्षक रेजितवाड साहेब यांनी मला योग्य त्या सुचना देवून पोकॉ/1400 कच्छवे यांचे मार्फतीने 11◌ः37 वा. डिजीटल व्हॉईस रेकॉर्डचे बटन चालु करुन माझ्या गळयात आडकावुन दत्तनगर येथील दुय्यम निबंधक कार्यालयात जाण्यास सांगितले मी व पंच क्रमांक 1 वाघमारे असे बाजुस असलेल्या दुय्यम निबंधक कार्यालयात जावून पिवळया रंगाची साडी घातलेल्या महिला या जाधव मॅडम असल्याचे पंचास ईषा-याने सागुन



Scanned with CamScanner

त्यांची पंचासमक्ष भेट घेतली असता त्यांनी माझ्◌ो वरील नमुद कामाच्या अनुशगाने पंचासमक्ष समोरासमोर चर्चा केली. चर्चे दरम्यान मी म्हणालो हं 166 ची पाहीजे.. त्यावर जाधव मॅडम म्हणाल्या 2325 हेच काय पाहीजे ? काय पाहीजे नेमके ? त्यावर मी म्हणाले◌ा मुल्यं◌ाकन.. आणि ही.. त्यावर जाधव मॅडम म्हणाल्या हे झालं तुमचं सर्च रिपोर्ट.. त्यावर मी म्हणालो हं.. त्यावर जाधव म्हणाल्या हे झालं इंडेक्स टु.. त्यावर मी म्हणालो हं.. त्यावर जाधव म्हणाल्या हे झालं नकला..त्यानंतर मी म्हणालो हं.. अशी कामाबाबत चर्चा करुन मी म्हणालो म्हणजे वरचे किती होयूलालेत ? त्यावर जाधव म्हणाल्या तीन दोनषे.. तीन दोनषे पंचेवीस त्यावर मी तीन हजार दोनषे पंचवीस रुपये..? म्हणालो त्यावर जाधव म्हणाल्या हं पंचेवीस... त्यानंतर मी तीन हजार दोनषे पंचेवीस रुपये..? म्हणालो असता त्यावर जाधव म्हणाल्या तीन हजार दोनषे पंचेवीस एवढी फीस झाली.. त्यावर मी म्हणालो हयची फीस.. त्यावर जाधव म्हणाल्या हां तुम्हाला वर काय द्यायचय ती तुमच्या खुषीनं द्या.. त्यावर मी म्हणालो वरी इथं किती होतेत ती बघा.. त्यावर जाधव म्हणाल्या काय द्यायचय ते द्या..तस मी काही म्हणत नाही तुम्हाला त्यावर मी म्हणालो तरी ? त्यावर जाधव म्हणाल्या खुषीनं तुम्हाला काय द्यायच ते द्या... अशी लाचेची स्पष्टपणे मागणी केली. त्यानतर मी म्हणालो किती तीन हजार दोनषे पचवीस ? ठीक हाय येतो मॅडम ही पावती बी देताव ना..? त्यावर जाधव पावत्या बाहेर काढावं लागतय की आम्ही नंबर टाकताव.. त्यावर मी म्हणालो असं हाय का..? त्यावर जाधव म्हणाल्या हं.. त्यावर मी म्हणालो म्हणजे ती घरच्याला बी थोडं दाखवायला.. त्यावर जाधव म्हणाल्या कस हाय पावत्या इथं एकस्ट्रा चार्जेस घेतात त्येनी एकस्ट्रा चार्जेसच्या पावत्या आम्ही कुठं द्यायचं तुम्हाला.. त्यावर मी हं हं.. असे म्हणून लाचेची रक्कम घेवून येण्यास सांगितले. काबाबत चर्चा करुन त्यानंतर मी व पंच क्रमांक 1 वाघमारे असे कार्यालयातून निघून बाहेर बाजूस थांबविण्यात आलेल्या सापळा पथकाच्या वाहनाजवळ 12◌ः21 वाजताचे सुमारास गेलो◌े असता पोकॉ कच्छवे यांनी माझेकडील व्हाईस रेकॉर्डर घेवून बंद केले. पोलीस उपअधीक्षक रेजितवाड साहेब यांनी माझ्या समक्ष पंच क्रमांक 1 वाघमारे यांना लाचेची मागणीच्या अनुशंगाने माझ्यात व जाधव मॅडम यांच्यात काय बोलने झाले याबाबत विचारणा केली असता पंच क्रमांक 1 वाघमारे यांनी मी वर नमुद केल्या प्रमाणे हकीकत सांगितली. आम्ही सर्वांनी व्हॉईस रेकॉर्डर हाताळणारे पोलीस कर्मचारी कच्छवे◌े यांचे मार्फतीने डिजीटल व्हॉईस रेकॉर्डर चालु करुन माझ्यात व जाधव मॅडम यांच्यात झालेले संभाशण ऐकुन हे पंच क्रमाक 1 वाघमारे यांनी सांगितलेल्या हकीकतीप्रमाणे असल्याचे खात्री करुन जाधव मॅडम यांनी माझ्या वर नमुद कामासाठी माझ्याकडे 3,225/- रुपये व वर काय द्यायचे ते द्या.. अशी लाचेची स्वतः मागणी करुन लाचेची रक्कम घेवुन येण्यास सांगितल्याने आम्ही सर्वानुमते त्यांचे विरुध्द 4,500/- रुपये लाचेची सापळा कार्यवाही करण्याचे ठरविण्यात आले.

पोलीस उपअधीक्षक रेजितवाड साहेब यांनी मला जाधव मॅडम यांना देण्यासाठी लाचेची रक्कम हजर करणे बाबत कळविले असता मी माझेकडील 500/-रुपये दराच्या 09 भारतीय चलनी नोटा असे एकुण 4,500/-रुपये समक्ष हजर केले. त्यावेळी पोलीस उपअधीक्षक रेजितवाड साहेब यांनी मला व पंचाना अ◌ॅन्थ्रासीन पावडरचा वापर, गुणधर्म याबाबत माहिती व प्रात्यक्षीक करुन दाखविले. मी हजर केलेल्या नोटांना पोना/1253 गिरी यांनी अ◌ॅन्थ्रासीन पावडर लावुन माझ्या अंगातील षर्टच्या समोरील डाव्या बाजुच्या खिशामध्ये ठेवुन लाचेची रक्कम दिल्यानंतर आपल्या पांढरा गमजा काढून हातात घेणे बाबतचा सुनियोजीत ईशारा म्हणुन सांगण्यात आला. पोलीस उपअधीक्षक रेजितवाड साहेब यांनी मला, दोन्ही पंच व सापळा पथकातील सदस्य यांना पुढील सापळा कार्यवाही बाबत पुन्हा सुचना दिल्या. पोलीस उपअधीक्षक रेजितवाड साहेब यांच्या सुचनेनुसार पोलीस कर्मचारी कच्छवे यांनी व्हाईस रेकॉर्डर 14◌ः16 वा. चालु करुन माझ्या गळयात अडकावुन दिले त्यानंतर मी व पंच क्रमांक 1 वाघमारे असे बाजूस असलेल्या दुय्यम निबंधक कार्यालयामध्ये जावुन मी म्हणालो आणलाव मॅडम पैसे... त्यावर जाधव मॅडम म्हणाल्या तेच मनायलेन... त्यावर मी म्हणालो हं.. असे म्हणून मी माझे अंगातील षर्टच्या समोरील डाव्या बाजुच्या खिषातील अ◌ॅन्थ्रासीन पावडरयुक्त 4,500/- रुपये (ज्यात 500/-रुपये दराच्या 09 भारतीय चलनी नोटा) लाचेची रक्कम लोकसेविका जाधव मॅडम यांना हं.. मॅडम तुमच्या फिसचे तीन हजार दोनषे पंचवीस अन ते वरचे... असे म्हणून जाधव मॅडम यांनी मागणी केलेली लाचेची रक्कम 4,500/- रुपये त्यांचे पुढे धरली असता त्य◌ांनी त्यांचे उजव्या हाताने सदरची अ◌ॅन्थ्रासीन पावडरयुक्त 4,500/-रुपये लाचेची रक्कम स्वीकारुन त्यांच्या चश्माच्या कव्हरमध्ये ठेवून जाधव मॅडम म्हणाल्या काढाय लावते ना आता... त्यावर मी म्हणालो लवकर द्या मॅडम.... ते साडेचार हायत बगा.. त्यावर जाधव म्हणाल्या बरं... त्यावर मी म्हणालो हं... त्यावर जाधव म्हणाल्या हं.. चलताय त्यावर मी म्हणालो वरचे मॅडम... त्यावर जाधव मॅडम अं.. त्यावर मी म्हणालो वरचे अं.. बाराषे पच्याहत्तर हायत वरचे... त्यावर जाधव म्हणाल्या बरं... त्यानंतर मी म्हणालो मॅडम साडेचार हजार दिलेत बरं तुम्ही ते घेतल्याले... त्यावर जाधव म्हणाल्या राहू द्या..मी काय त्येच्यात काय कमी जास्त... मी काय... त्यावर मी म्हणालो तीन हजार तीनषे पंचेवीस म्हणलो... त्यावर जाधव म्हणाल्या हं.. तीन हजार तीनषे पंचेवीस... त्यावर मी म्हणालो दोनषे



Scanned with CamScanner

पंचेवीस.. त्यावर जाधव म्हणाल्या चालतय..., त्यावर मी म्हणालो आणि वरी कीती होतील..? एक हजार दोनसे पंच्याहत्तर रुपये वरी..., त्यावर जाधव म्हणाल्या चालतय.., त्यावर मी कामाच्या बाबत चर्चा करुन कार्यालयाचे बाहेर येवून नियोजीत लाचस्विकृतीचा इशारा केला. पोलीस उपअधीक्षक रेजितवाड साहेब व पंच क्रमांक 2 पल्लवी जाधव व सापळा पथकातील सदस्य सदर ठिकाणी आले. माझेकडील व्हाईस रेकॉर्ड पोलीस कर्मचारी कच्छवे यांचेकडे दिले ते त्यांनी घेवुन बंद केले. त्यावेळी पोलीस उपअधीक्षक रेजितवाड साहेब यांनी पंच क्रमांक 1 वाघमारे यांना लाचेची रक्कम कोणी स्विकारली? याबाबत विचारणा केली असता पंच क्रमांक 1 वाघमारे यांनी समोर पिवळ्या रंगाची साडी घातलेल्या महिलेकडे हात करुन या जाधव असुन त्यांनी मागणी केलेली 4,500/-रुपये लाचेची रक्कम ही त्यांच्या समोर स्विकारुन आपल्या चश्मा कव्हरमध्ये ठेवली आहे बाबत सांगितले. मी वर सांगितलेल्या हकीकती प्रमाणे मिळती जुळती हकीकत पंच क्रमांक 1 वाघमारे यांनी सांगीतली त्यावेळी पोलीस उपअधीक्षक रेजितवाड साहेब यांनी त्यांचेकडील ओळखपत्र जाधव मॅडम यांना दाखवून त्याचे नाव गाव विचारले असता त्यांनी त्यांचे नांव अश्विनी दत्तात्रय जाधव वय 47 वर्षे, पद कनिष्ट लिपिक, वर्ग 3, नेमणुक दुय्यम निबंधक कार्यालय, निलंगा ता. निलंगा जि. लातूर रा. आदर्श कॉलनी, लातूर असे असल्याचे सांगितले. पोलीस उपअधीक्षक रेजितवाड साहेब यांनी पंच क्रमांक 2 पल्लवी जाधव यांचे हस्ते लिपिक जाधव मॅडम यांच्या जवळील चश्माचे कव्हरमध्ये ठेवलेली लाचेची रक्कम काढुन घेवुन पंच क्रमांक 1 वाघमारे यांचे मार्फतीने सापळा कार्यवाही दरम्यान लिहुन घेण्यात आलेल्या नोटांचे वर्णन व नंबरशी पडताळून पाहीले असता ते एकच असल्याचे निदर्शनास आले. त्यानंतर दुय्यम निबंधक कार्यालय, निलंगा येथील कार्यालय प्रमुख यांना आरोपी लोकसेविका अश्विनी जाधव यांनी स्विकारलेली 4,500/- लाचेच्या रक्कमेबाबत माहिती देवून अधिक माहिती घेतली असता अशोक चिंदे, दुय्यम निबंधक, निलंगा यांनी अश्विनी जाधव यांना कुठल्याही प्रकारच्या कामासाठी सर्चरिपोर्ट, नकला देणे, मुल्यांकन देणे, सुची क्र.2 देण्यासाठी ई-चलन व्यतिरीक्त पैसे मागण्याचा तथा स्विकारण्याचे अधिकार नाही. त्यांनी स्विकारलेली 4,500/- रुपये रक्कम कार्यालयीन फीस नसून लाचेची रक्कम असलेबाबत लेखी पत्राव्दारे कळविले आहे. तेथील आवश्यक ती सापळा कार्यवाही करुन सदर ठिकाणी गर्दी होत असल्याने पोलीस उपअधीक्षक रेजितवाड साहेब यांनी पुढील कार्यवाही करणे करिता लिपिक जाधव मॅडम यांना सोबत घेवून घटनास्थळावरुन रवाना होवून ला.प्र.वि. लातूर कार्यालयात येवून पुढील कार्यवाही पुर्ण केली.

तरी यातील लोकसेविका अश्विनी दत्तात्रय जाधव वय 47 वर्षे, पद कनिष्ट लिपिक, वर्ग 3, नेमणुक दुय्यम निबंधक कार्यालय, निलंगा ता. निलंगा जि. लातूर रा. आदर्श कॉलनी, लातूर यांनी हिस्से पडलेल्या जमीनीचे सर्च रिपोर्ट, सुची क्र. 2, मुल्यांकन व दस्ताच्या नकलांची माहिती पुरविण्यासाठी पंचासमक्ष माझ्याकडे फिसच्या नावाखाली 3,225/-रुपये व वर काय द्यायचे ते द्या..! असे म्हणून लाचेची स्वतः मागणी करुन पावती तथा चलन न देता लाचेची रक्कम 4,500/- रुपये दिनांक 25/07/2023 रोजी दत्तनगर, निलंगा येथील दुय्यम निबंधक कार्यालयात 14:31 वा. चे सुमारास पंचासमक्ष स्वतः स्विकारली आहे. म्हणुन माझी आरोपी विरुध्द कायदेशिर तक्रार आहे.

मी वर नमुद प्रमाणे सांगितलेली तक्रार ही पोना गिरी यांनी लॅपटॉपवर टंकलिखीत केली असुन त्यांची प्रींट काढल्यानंतर ती मी वाचुन पाहिली. ती मी सांगितल्या प्रमाणे बरोबर खरी आहे.

समक्ष
ही फिर्याद दिली



Scanned with CamScanner

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.** (केलेली कारवाई: बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

(1) **Registered the case and took up the investigation:**
**(प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):**

BALKRISHNA RAMCHANDRA SHEJAL(I (Inspector)) / **or** (किंवा)

(2) **Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव):

**Rank** (पद): **No.**(क्र.):

**to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or** (किंवा)

(3) **Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.**
(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):

**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

14 **Signature/Thumb impression of the complainant / informant.**
(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

15. **Date and time of dispatch to the court**
(न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

ठाणे अमलदार
पोलीस ठाणे निलंगा

**Signature of Officer in charge, Police Station**
(ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)

**Name** (नाव): BALKRISHNA RAMCH
**Rank**(पद): (Inspector)
**No.**(सं.):



Scanned with CamScanner